# थकित कर्ज वसुली कर्जदारांकडून की जामिनदारांकडून हा पतसंस्थेचा अधिकार



पतसंस्थेने सभासदाला जामिनदार घेऊन कर्ज मंजूर करून जर वितरीत केले तर, त्या कर्ज परतफेडीची व्याज व इतर आकारणी रकमेची वसुली ही मूळ कर्जदार आणि / किंवा सर्व जामिनदारांकडून करण्याचे संपुर्ण अधिकार कर्ज देणाऱ्या पतसंस्थेवर अवलंबून आहे. कर्जदाराला पतसंस्थेकडून कर्ज मिळणेसाठी ज्यावेळी जामिनदार हे कायदेशीररित्या जबाबदारी घेतात, त्यावेळी ते कर्ज व्याजासह व इतर आकारणी रकमेसह कोणाकडून वसुल करायचे याचे संपुर्ण कायदेशीर अधिकार हे त्या पतसंस्थेला आहेत, असे अनेक न्यायालयांचे निकाल आहेत.

सर्वसाधारणपणे कर्जदाराने एकदा जामिनकी देवून एखाद्या पतसंस्थेकडून जर कुठल्याही प्रकारचे कुठल्याही कारणासाठी कर्ज घेतले तर, **जामिनदार हे सदरहू येणे रक्कम प्रथम कर्जदाराकडून वसुल करा व जर वसुल झाले नाही तर ते कर्ज आम्हां जामिनदारांकडून वसुल करा, असे म्हणण्यास जामिनदारास कुठलाही कायदेशीर अधिकार नाही.**

कर्ज वसुली करताना प्रथम कर्जदाराकडे जा व जर कर्ज वसुल झाले नाही तर आम्हां जामिनदारांकडे वसुलीसाठी या, असे जामिनदार म्हणू शकत नाहीत असे न्यायालयाचे आदेश पतसंस्थाच्या व इतर वित्तीय संस्थांना सुध्दा दिलासा देणारे आहेत. कर्ज वसुली कर्जदाराकडून की जामिनदारांकडून करायची, हा पतसंस्थेचा अधिकार असल्याचे आधीपासूनच अत्यंत स्पष्ट आहे. म्हणून **पतसंस्थेने कर्जाची वसुली प्रथम कर्जदाराकडूनच केली पाहिजे, आणि त्यानंतरच जामिनदाराकडे गेले पाहिजे, असे म्हणणे कायद्याच्या तत्त्वाच्या विरोधात आहे.**

नुकतेच वरील विषयाच्या संदर्भात एक कायदेशीर निकाल नुकताच जाहिर झालेला आहे. केरळमधील रहिवाशी आर.एस.वासन यांनी कॅनरा बँकेच्या विरोधात एक याचिका दाखल केली होती. कॅनरा बँकेने वासन यांना रूपये १,४९,६९८/- भरण्याचा आदेश दिला होता. त्या विरोधात वासन यांच्या बाजूने जिल्हा तसेच राज्य ग्राहक आयोगाने निकाल दिला होता. पण त्याला कॅनरा बँकेने आव्हान

दिले होते. या दोन्ही आयोगाचे निकाल राष्ट्रीय आयोगाने रद्दबादल केलेले आहेत. वासन या जामिनदाराने कर्जदाराच्या कागदपत्रावर स्वतःहून सह्या करून जामिनकीची जबाबदारी स्विकारण्याची कागदपत्रे दिली होती. त्यामुळे **त्यांच्याकडून कर्जदाराऐवजी जामिनदारांकडून कर्जवसुली करणे गैर ठरत नसल्याचेच राष्ट्रीय आयोगाचे म्हणणे आहे. म्हणजेच जामिनदारांकडून किंवा कर्जदारांकडून किंवा एकाचवेळी सर्वांकडून कर्ज वसुल करावयाचे किंवा नाही याचा सर्वस्वी अधिकार हा कर्ज देणाऱ्या वित्तीय संस्थेचाच कायद्याने आहे, हा महत्त्वपुर्ण निकाल हेच दर्शविते.**

अनेक वेळा जामिनदार या संदर्भात कोणाच्या तरी सांगण्यावरून कर्जाची परतफेड करण्याची पहिली जबाबदारी ही कर्जदाराची आहे, परंतु जामिनदारांची नाही असे मुद्दे उपस्थित करून वेळ काढला जातो. किंबहुना त्यासाठी अनावश्यक रकमाही खर्च केल्या जातात. त्यांचेसाठी सुध्दा हा निकाल फायद्याचा ठरू शकतो. कारण जामिनदार म्हणून माझी प्रथम जबाबदारी नाही हे म्हणणे सिध्द करण्यासाठी हजारो रूपयांची नाहक रक्कम मोजण्यापासून सुटका होऊ शकते. व तीच रक्कम ज्यास आपण जामिनदार राहिलेला आहात व ती रक्कम १०० टक्के जामिनदाराने देय आहे, त्या कर्ज खात्यात भरणे हे केव्हाही प्रत्येकाच्या फायद्याचेच आहे. हे प्रामुख्याने पतसंस्था, नागरी सहकारी बँका, जिल्हा मध्यवर्ती बँका, राज्य सहकारी बँक, कमर्शिअल व शेड्युल्ड बँका तसेच इतर वित्तीय संस्थांना सुध्दा निश्चितपणे लागू आहे. हेच या निमित्ताने आपल्या सर्वांच्या अर्थात कर्ज देणाऱ्या वित्तीय संस्थांसाठी निदर्शनास आणून दिलेले आहे.

**जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार !!!**